आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१२ मार्च २०२६ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- भारताचा ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजांना होर्मुझ ओलांडण्यासाठी इराणची परवानगी

- तीन अटींवर युद्ध थांबवण्याची इराणची तयारी

- शेतीमधे महिलांचा धोरणात्मक सहभाग वाढायला हवा असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

**आणि**

- मुंबईमध्ये वाढत्या उंच इमारतींच्या पार्श्वभूमीवर अग्निसुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर आणि इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांच्यात झालेल्या चर्चेनंतर इराणने भारताचे ध्वज असलेल्या दोन तेलवाहू जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी दिली आहे. पुष्पक आणि परिमल ही दोन्ही जहाजं होर्मुझमधून प्रवास करून भारतात येतील. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे भारताची २८ जहाजं होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या परिसरात थांबून आहेत. या जहाजांवर सुविधा पुरवणं आणि सुरक्षितता यांवर संबंधित अधिकारी लक्ष ठेवून आहेत.

**<><><><><>**

अमेरिका - इस्राएल विरुद्ध इराण युद्धाचा आज १३वा दिवस आहे. दोन्ही बाजूंनी हल्ले सुरुच असल्यानं पश्चिम आशिया क्षेत्रात अद्याप संहार थांबलेला नाही. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियान यांनी युद्ध थांबवण्यासाठी तीन अटी जाहीर केल्या आहेत. अल ज़जीरा या दूरचित्रवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितलं की, इराणच्या कायदेशीर हक्कांचं संरक्षण, युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई आणि भविष्यात हल्ला होणार नाही अशी आंतरराष्ट्रीय हमी मिळाली तर इराण तात्काळ युद्ध थांबवायला तयार आहे. मात्र ही तयारी म्हणजे इराणची कमजोरी असल्याचा समज करुन घेऊ नये, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

युद्ध थांबवण्याची योग्य वेळ अद्याप आली नसल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. केंटकी इथं एका सभेत त्यांनी सांगितलं की युद्धात अमेरिकेचा विजय झाला आहे, मात्र मिशन पूर्ण होईपर्यंत लढाई संपणार नाही असं ते म्हणाले.

या युद्धावर पहिल्या ६ दिवसात अमेरिकेचे ११ अब्ज ३० कोटी डॉलर्स खर्च झाले असल्याचं अमेरिकन संरक्षण मंत्रालय पेंटागॉनने तिथल्या संसदेत सांगितलं.

<><><><>

अमेरिका-इस्रायल आणि इराण दरम्यान सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्यावरून आज विरोधकांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. लोकसभेत विरोधकांच्या निषेधाच्या घोषणांमुळे सभागृहाचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभा सभापती ओम बिरला यांच्या विरोधातला अविश्वास ठराव काल आवाजी मतदानाने फेटाळला गेला, त्यानंतर आज बिरला यांनी कामकाजाची सूत्रं हातात घेतली. अविश्वास प्रस्तावावर सभापती ओम बिर्ला यांनी आज निवेदन दिलं. बिर्ला यांच्या निवेदनानंतर दुपारी २ वाजेपर्यंत लोकसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेत आज जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्यावरच्या हल्ल्याची सखोल चौकशी केली जाईल, असं आश्वासन सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी दिलं. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला काल एका हल्लेखोराने केलेल्या गोळीबारातून सहीसलामत बचावले. अब्दुल्ला जम्मू इथं एका विवाहसोहळ्याला गेले असताना ही घटना घडली. हल्लेखोराला पोलिसांनी पकडलं असून पुढचा तपास सुरु आहे.

<><><><>

ऐतिहासिक दांडी यात्रेत सहभागी झालेल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांना उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अभिवादन केलं. १९३०मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली आजच्याच दिवशी सुरू झालेली दांडी यात्रा हा भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातला एक निर्णायक क्षण होता, असं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आसाममधे गुवाहाटी येथून प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा २२ वा हप्ता वितरित करणार आहेत. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नवी दिल्लीत ही माहिती दिली. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्या १८ हजार ६४० कोटी रुपये थेट देशातल्या पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरीत करतील असंही त्यांनी सांगितलं. या योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत ४ लाख २७ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आल्याचंही त्यानी म्हटलं आहे.

**<><><><><>**

शेतीमधे बियाणं पेरण्यापासून ते पीक प्रक्रीयेपर्यंत महिला महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात त्यांचा सहभाग धोरणनिर्मितीत वाढायला हवा असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. शेती आणि अन्न प्रणालीत महिलांची भूमिका या विषयावर नवी दिल्ली इथं आयोजित आंतरराष्ट्रीय परिसंवादाला त्या संबोधित करत होत्या. शेती आणि संलग्न उपक्रमांमधे भरीव योगदान देणाऱ्या शेतकरी महिलांच्या कार्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्रातल्या राहीबाई पोपेरे यांच्या बीज संरक्षण कार्याचा उल्लेख राष्ट्रपतींनी भाषणात केला.

**- - - होल्ड - बाईट - राष्ट्रपती - - -**

शेतकरी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारने राबवलेल्या लखपती दीदी, डेरोन दीदी अशा विविध योजनांची माहिती राष्ट्रपतींनी दिली.

**<><><><><>**

मुंबईमध्ये वाढत्या उंच इमारतींच्या पार्श्वभूमीवर अग्निसुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली. उंच इमारतींमध्ये उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी अग्निशमन दलाची क्षमता वाढविण्यावर सरकार भर देत असल्याचे सामंत यांनी यावेळी सांगितलं. प्रवीण दरेकर यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.

हवामान बदल आणि त्याचा शेतीवर होणारा गंभीर परिणाम हे सरकारसमोरचं मोठं आव्हान असून त्या त्या वेळी सरकारनं योग्य ती पावलं उचलली आहेत, भविष्यात येणाऱ्या आव्हानांनाही तोंड द्यायला सरकार तयार आहे, मात्र समाजातल्या सर्व घटकांनी यासाठी हातभार लावायला हवा, असं आवाहन राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी आज विधानपरिषदेत केलं. अमोल मिटकरी यांनी याबद्दलची अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. विविध विकास

प्रकल्पांसाठी पर्यावरणीय परवानग्या घेतल्या जातात, पण त्यातल्या अटींची पूर्तता होत नाही, त्यासाठी पर्यावरणीय मानकांची कडक अंमलबजावणी करणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले.

वातावरण बदलामुळे शेतीसह सर्वच क्षेत्रांसमोर निर्माण झालेल्या मोठ्या आव्हानांचा सामना करण्यात कृषी विद्यापीठांच्या संशोधनाची भूमिका महत्त्वाची असून या विद्यापीठांसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली आहे, तसंच पदभरतीलाही मान्यता दिली आहे, असं ते म्हणाले. प्रदूषण, हवामान बदलाविषयी जागरूकता निर्माण करण्याची आणि शालेय शिक्षणात पर्यावरण शिक्षण सक्तीचं करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

<><><><><>

विधान परिषदेच्या कामकाजाला आज सुरु झाल्यानंतर अर्धा तास चर्चेला उत्तर देण्यासाठी कोणत्याही संबंधित खात्यांचे मंत्री सभागृहात उपस्थित नसल्याबद्दल विक्रम काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांना सभागृहात येण्याचे निरोप गेले आहेत, असं सांगत ते येईपर्यंत पीठासीन अधिकाऱ्यांनी कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केलं.

<><><><><>

जमिनीला लागून असलेल्या घरांचाच समावेश झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत असल्याने मुंबई शहरात झोपड्यांच्या वरच्या मजल्यावरल्या झोपडीधारकांना पात्र ठरवता येणार नाही, असं मंत्री शंभुराज देसाई यांनी स्पष्ट केलं. ते विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. पोटमाळा किंवा वरच्या मजल्यावर राहणाऱ्यांना योजनेचा लाभ देता येणार नाही असं देसाई यांनी सांगितलं. सुनील प्रभू यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

पोटमाळा किंवा वरच्या मजल्यावरल्या झोपडीधारकांना पात्र ठरवलं नाही तर मुंबई झोपडपट्टीमुक्त होणं अशक्य आहे, त्यामुळे कायद्यात बदल करून यांना पात्र ठरवण्यात यावं अशी मागणी अस्लम शेख यांनी केली. यावर मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल असं देसाई यांनी सांगितलं.

मौलाना आझाद महामंडळासाठी ७०० कोटींपर्यंत निधीची तरतूद वाढवली आहे. यात मुदत कर्ज योजने अंतर्गत ११ हजार ४५४ लाभार्थ्यांना १५६ कोटींचं वाटप झालं असून ३३८ कोटी ८२ लाख रुपये शैक्षणिक कर्ज आतापर्यंत वाटप झाल्याचं मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. या शैक्षणिक वर्षात निधी उपलब्ध नसल्यामुळे कर्ज वाटप झालं नाही, केंद्र सरकारकडून १५ कोटी मिळाले असून ७३ कोटी

बाकी आहेत. निधी मिळाला की लाभार्थ्यांना लवकरात लवकर वाटप केलं जाईल असं भरणे यांनी सांगितलं. नितीन राऊत, अस्लम शेख यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता.

**<><><><><>**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, राज्याचे पहिले मुख्यमंत्री दिवगंत यशवंतराव चव्हाण यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन केलं आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी कराड इथल्या प्रीती संगमावर जाऊन चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेऊन आदरांजली वाहिली.

मुंबईत मंत्रालयात तसंच इतर जिल्ह्याजिल्ह्यांच्या मुख्यालयांमधे यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करण्यात आलं. नाशिकच्या आरोग्यविज्ञान विद्यापीठातही यशवंतराव चव्हाण यांना आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

गुजरात, मध्यप्रदेशसह महाराष्ट्रातून दुचाकी चोरणाऱ्या टोळीतल्या एका संशयिताला काल नंदूरबार पोलिसांनी ताब्यात घेतलं. त्याची चौकशी केल्यानंतर तो शिदखेड्यातील दोघांच्या मदतीने हा दुचाकी चोरीचं रॅकेट चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याच्याकडून चोरीच्या १८ दुचाक्या जप्त करण्यात आल्या असून त्यातल्या दहा त्याने गुजरात आणि मध्य प्रदेशातून चोरल्या आहेत.

//<><><><><>//